रंग बलिदानाचा त्या तिरंग्यात
पहावा, उत्साह देशप्रेमाचा अंगी
संचारावा, जयघोष भारताचा
आसमंती गुंजावा सण हा
स्वातंत्र्याचा सदैव चिरायु व्हावा,
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



आमदार सिध्दार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 26 ■ शुक्रवार, दि. 15 ऑगस्ट 2025 ■ पाने 8 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




# आमदार सिद्धार्थ खरात

## अल्पावधीतच बनले

## मतदारांच्या गळ्यातील ताईत

### चाणाक्ष बुद्धीने प्रशासनावर पकड: मतदारांचा विश्वास सार्थकी लागला







आजोबांनी आमदार सिद्धार्थ खरात यांची पाठ थोपटून कौतुक केले.



मा. श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे व लोकप्रिय आमदार सिद्धार्थ खरात..!

राजकीय क्षेत्र हे पैसा कमवण्याची नसून गोरगरीब जनता... मायबाप शेतकऱ्यांचे प्रश्न निकाली काढून त्यांच्या जीवनातही आनंदाची बाग फुलवीण्याची पवित्र असे सर्वोच्च ठिकाण आहे. आमदार असो किंवा इतर कोणताही लोकप्रतिनिधी तो केवळ मतदारांच्या विश्वासानेच पदावर बसतो. मतदारांनी टाकलेल्या या विश्वासाला सार्थकी लावत मतदार संघात कधी नव्हे एवढा विकास कामाचा सपाटा लावून मतदार संघातील चेहरा मोहरा बदलण्यास सुरुवात झाल्याने आमदार सिद्धार्थ खरात अल्पावधीतच मतदार संघातील मतदारांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. त्यांनी आपल्या पदाचे ईमान राखत कार्य केल्याचे मतदारही त्यांच्यावर भरभरून प्रेम करीत आहेत. मतदारांचे हे प्रेम.. मतदारांच्या चेहऱ्यावरील फुललेले स्मितहास्य हे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या विकास कामाची पोचपावती असल्याचे दिसून येत आहे.

बोले तैसा चाले । त्याची वंदीन पाउले ।।
अंगे झाडीन अंगण । त्याचे दासत्व करीन ।।
त्याचा होईन किंकर । उभा ठाकेन जोडोनि कर ।।
तुका म्हणे देव । त्याचे चरणी माझा भाव ।।

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या या ओवीला साजेसे असे काम आमदार सिद्धार्थ खरात यांनी मतदारसंघात केले आहे. मतदार संघातील एका शेतकरी कुटुंबातील हा उच्चशिक्षित तरुण आपल्या जिद्द व बळावर देशाची आर्थिक राजधानीचे ठिकाण असलेल्या मुंबई येथे राज्याच्या मंत्रालयात सहसचिव पदाची नोकरी केली. मात्र, गावातील गावपण, गावातील सवंगडी, कामानिमित्ताने गावाकडे झालेली धावती भेट आणि या भेटीत मतदार संघातील मायबाप शेतकऱ्यांचे दिसणारे चित्र हे त्यांना नेहमीच सतावत गेले. गावात आल्यानंतर सर्वांना भेटावे आनंदात वेळ घालावी थोडी मौजमजा करावी अशी अपेक्षा घेत गावाकडे आल्यानंतर गावातील चित्र आणि गावातील गावाकडील वडीलधारी मंडळी मित्र यांची भेट होताच हिरमोड व्हायचा. भेटीनंतर इकडच्या अनेक समस्यांचा पाढाच गावाकडील मंडळी वाचायचे. शासन एवढा निधी खर्च केल्यानंतरही गावाकडील विकास का होत नाही. गावामध्ये साधे रस्ते नाहीत, पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही, इतर प्राथमिक सोयी-सुविधा उपलब्ध नाहीत. हा प्रश्न सतत मनाला सतावत असल्याने सिद्धार्थ खरात मेट्रो सिटीत आपले आलिशान जीवन व मंत्रालयीन सहसचिव पदाची नोकरी सोडून दिली. बक्कळ पैसा, प्रतिष्ठा, गाडी बंगला असं सर्व काही असताना गावाकडे येत गावातील चिखल मातीत राबराब राहणाऱ्या मायबाप शेतकऱ्यांच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मनात निश्चय केला आणि शिवसेनाप्रमुख हे हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने प्रभावित झालेल्या या उच्च विद्याविभूषित आणि उच्च पदावर असतानाही गावाकडील माणसासाठी पुढील आयुष्य खर्च करण्याचा निर्णय घेत राजकारणाच्या मैदानात उडी मारली. मेहकर येथील ग्रामदैवत श्री शारंगधर बालाजी यांच्या चरणी नतमस्तक होत विधानसभेच्या मैदानात पाऊल ठेवले. मंत्रालयाने सहसचिव पदावर काम केल्याच्या नंतर त्याचा अनुभव गावाकडील विकासासाठी हवा यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेत गावाकडे समस्या जाणून घेतल्या गावागावात भेटी दिल्या. शेतकऱ्यांशी हितगुज करून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या आणि मायबाप शेतकऱ्यांसाठी किमान प्राथमिक सोयी सुविधा तर,आपल्या हातून उपलब्ध व्हाव्यात. या उदात्त हेतूने प्रयत्न केले.शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या मतदार संघातील मतदारांनी मूळ शिवसेनेला पसंती देत उच्च विद्यविभूषीत विकासाचा अजेंडा असलेल्या मंत्रालयीन सहसचिव पदाची नोकरी सोडून गावाच्या परिसरातील विकासाचा ध्यास घेत विधानसभा लढविणाऱ्या सिद्धार्थ खरात यांना सर्व स्तरातून प्रचंड पाठिंबा दिला. अवघ्या चार ते सहा महिन्याच्या कालावधीतच सिद्धार्थ खरात यांनी निवडणुकीपूर्वी मतदार संघातील तब्बल दीडशेच्यावर गावात प्रत्यक्ष भेटी देत शेतकरी सर्वसामान्य नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. एवढेच नव्हे तर, निवडणूक काळात शेतकऱ्यांचे परिश्रम काय असतात. हे जाणून घेण्यासाठी त्यांनी बांधावरच नव्हे तर सोयाबीन गंजीवर जाऊन मळणी यंत्रात सोयाबीन टाकून शेतकऱ्याचे परिश्रम जाणून घेतले. एक उच्च विद्यविभूषीत व्यक्तिमत्व विकासाचा अजेंडा असलेल्या सिद्धार्थ खरात यांना मतदारांनी भरभरून प्रतिसाद देत मतदार संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी देत विधानभवनात पाठवले. आमदार सिद्धार्थ खरात यांनीही मतदाराने टाकलेल्या विश्वास सार्थकी लावत मतदारसंघातील रखडलेल्या कामांना पूर्ण करण्याचा सपाटा लावला. औद्योगिक विकास महामंडळाचे रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी सतत पाठपुरावा करत एमआयडीसीची जागा अतिक्रमण धारकांच्या विळख्यातून मुक्त केली. त्या ठिकाणी प्राथमिक सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी शासन दरबारी सतत पाठपुरावा करत सदर प्रश्न विधानसभेत मांडला. त्यामुळे मतदार संघातील तब्बल पंचवीस वर्षांपासून रखडलेला हा प्रश्न आता मार्गी लागला आहे. त्याचबरोबर मतदार संघातील इतर प्राथमिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार सिद्धार्थ खरात हे सतत शासन प्रशासन दरबारी प्रश्न मांडून तो मार्गी लावत असल्याने मतदार संघाचे रुप आता बदलत चालले आहे. आमदार सिद्धार्थ खरात यांच्यासारख्या उच्च विद्यविभूषीत व विकासाची जाण असलेल्या आमदार रुपी लोकप्रतिनिधिमुळे मतदार संघातील रखडलेले काम आता मार्गी लागत असल्याने सर्वसामान्यांमध्ये व मतदार संघातील मतदारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विकास कामाच्या बळावर आमदार सिद्धार्थ खरात हे मेहकर लोणार मतदार संघातील मतदारांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत.

**सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात विविध उपक्रम**

उत्कर्ष फाऊंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, कृषी, दुग्ध उत्पादक शेतकरी यांच्या हितासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. मुलींसाठी मोफत ब्युटी पार्लर कोर्स सुरू करून रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. स्किल ऑन व्हील या उपक्रमाद्वारे रोजगाराची संधी उत्कर्ष फाउंडेशनच्या वतीने स्किल ऑन व्हील या उपक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालय येथे आयोजन करून विद्यार्थ्यांना कौशल्य विकास शिक्षणाविषयी मार्गदर्शन करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

**तरुणांचा विकास हाच ध्यास ठेवून कार्याला प्राधान्य**

हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी राजकारणापेक्षा समाजकारणावर जास्त भर द्या,अशी शिकवण दिली आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणी वर आजही शिवसेना चालत आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात शिवसेनाही सर्व सामान्य गोरगरिबांची पाठीराखी शिवसेना म्हणून ओळखली जात आहे. बाळासाहेबांच्या याच तत्वावर उबाठाचे शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे हे सुद्धा काम करीत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातच मेहकर लोणार मतदार संघातील व्हावी पासून उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांना सहज रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी छत्रपती संभाजीनगर, पुणे, चाकण, नागपूर, सिताबर्डी आदी ठिकाणच्या औद्योगिकीकरणाप्रमाणेच विकास करण्यासाठी आमदार सिद्धार्थ खरात हे शासन, प्रशासन दरबारी सतत पाठपुरावा करीत आहेत. युवकांच्या हाताला रोजगार मिळावा, यासाठी रोजगार मिळावे घेऊन तब्बल ३०० च्या वर युवकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. मतदार संघातील जनतेला जनतेला स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी आमदार सिद्धार्थ खरात ही सतत पाठपुरावा करत आहेत. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे शेकडो युवकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तर, मतदार संघातील एमआयडीसी सुद्धा सुरू करण्यासाठी त्यांची सतत धडपड सुरू असून शासन दरबारी पाठपुरावा केला जात आहे.

**गोरगरिबांना मदतीचा हात**

ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करत असताना ग्रामीण भागातील जनता ही आर्थिक दृष्ट्या प्रचंड गरीब आहे. रुग्णालयात जाण्यासाठी ही काहींकडे पैसा राहत नाही.एखादे संकट आल्यास त्यातून सावरल्याही जात नाही. ही बाब हेरून आपणही समाजाचे दायित्व स्वीकारावे या उदात्त हेतूने आमदार सिद्धार्थ खरात यांनी गोरगरिबांना मदतीचा हात देत त्यांच्या जीवनात आनंद फुलवण्याचे काम केले आहे. पोलिस भरतीचा सराव करीत असलेल्या युवकाला दुचाकीस्वारे अचानक धडक दिल्याने होतकरू मुलगा जखमी झाला. या घटनेची माहिती मिळताच आमदार सिद्धार्थ खरात यांनी सदर जखमी युवकाच्या निवासस्थानी भेट देऊन विचारपूस केली व धीर देत सर्व मदत केली.

**राजकारणाबरोबरच सामाजिक व धार्मिक कार्यातही सहभाग**




मतदार संघ हा ग्रामीण भागात असल्याने मतदारांची धार्मिकतेशी जोडलेली नाळ आजही कायम आहे. परिश्रमाबरोबरच त्यांना त्यांची श्रद्धाही धार्मिक कार्यावरही असल्याने आणि यातून सकारात्मक ऊर्जा मिळत असल्याने आमदार सिद्धार्थ खरात यांनी सुरुवातीपासूनच गावगड्यातील मायबाप जनतेसोबत धार्मिक कार्यात सहभाग घेतला आहे. त्यांनी सुलतानपूर येथील प्रसिद्ध वेदांत आश्रम सिद्धपूर येथे प.पू. ब्रह्मलीन सखाराम महाराज हिवरेकर यांच्या २६ व्या पुण्यतिथी निमित्त चिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी मेहकर व लोणार तालुक्यातील वेगवेगळ्या गावातून पायदळ वारी दिंड्यांना सिद्धार्थ खरात यांनी विना सह साहित्य वाटप केले. याचबरोबर इतर यात्रा, उत्सव, पारायण अशा धार्मिक कार्यातही त्यांनी सहभाग घेत आपले संस्कृती जोपासण्याचे काम केले आहे.त्याच्या राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक व धार्मिकही क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान लाभत असल्याने आमदार सिद्धार्थ खरात हे राजकीय,सामाजिक व धार्मिक क्षेत्रातही त्यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जात आहे. अन् आमदार सहपरिवार आषाढी एकादशीच्या वारीत महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरीचे पांडुरंग अर्थात विठ्ठल रुक्माईवर संपूर्ण महाराष्ट्रातील गोरगरीब असो या श्रीमंत...भक्तांची अपार भक्ती आहे. मेहकर -लोणार मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात हेही पंढरीच्या पांडुरंगाचे भक्त असल्याने त्यांनी आपल्या आलिशान साजबाज बाजुला ठेवून पंढरीच्या वाटेवर चालणाऱ्या गोरगरीब भक्तांसोबत आषाढी वारीत सहपरिवार सहभागी होत विठ्ठलाच्या भक्तांचा महिमा अनुभवला. पंढरीच्या पांडुरंगाच्या वारीत पायदळ चालण्याची ऊर्जा तर मिळालीच त्याचबरोबर संपूर्ण हिनभाग जाऊन वर्षभर पुरेल एवढी ऊर्जा मिळाली असल्याची भावना आमदार सिद्धार्थ खरात यांनी पंढरीच्या वारीबाबत बोलताना व्यक्त केली.

कितीही संकट येवो आणि काहीही हो.. प्रत्येक भक्ताची आषाढी वारीही नित्याचीच. या वारीत कधीही खंड पडू नये, यासाठी सर्वांचाच प्रयत्न असतो. गोरगरीब भक्त आपल्या हातचे काम सोडून तब्बल महिनाभर वारीमध्ये पायदळ चालतात. विठ्ठल नामाचा गजर करत पंढरीच्या पांडुरंगाचे आषाढी एकादशीला दर्शन घेऊन परत येतात. पांडुरंगाचे दर्शन झाल्यानंतर तब्बल वर्षभर पुरेल एवढी ऊर्जा भक्तांना सहज मिळते. भूक नाही, तहान नाही, पायी चालण्याचा हिनही नाही. अशी वर्षानुवर्षापासून वारी चालत आलेली आहे. वारी म्हणजे गोरगरीब कष्टकरी शेतकऱ्यांचा जीवनातील सर्वोच्च धार्मिक उत्सव आहे. गोरगरीब कष्टकऱ्यांची पंढरीच्या पांडुरंगाच्या वारीत बहुतांश व्हीआयपी लोक सहभागी होत नाहीत. पांडुरंगाच्या दर्शनाला गेले तरीही त्यांना व्हीआयपी दर्शनाची सुविधाही असते, असे असताना पंढरीच्या पांडुरंगाचे भक्त असलेले मेहकर लोणार मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी आपले आमदारकी बाजुला ठेवून सहपरिवार आषाढी वारीत सहभागी होत पांडुरंगाच्या भक्तांचा महिमा अनुभवला आहे.

**अन् दुर्गम भागातील मेळजानोरीचे भाग्य उजळले**

मेहकर तालुका हा आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक अशा सर्वच बाबतीत माघासलेला तालुका आहे. त्याचबरोबर या तालुक्यात डोंगराळ दुर्गम भाग असल्यामुळे अपेक्षित विकासाला गती मिळाले नाही. आदिवासी भाग असल्याने पारंपारिक व्यवसायावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याची परंपरा वर्षानुवर्षापासून चालत आली आहे.त्यामुळे तालुक्यातील दुर्गम भागातील अनेक खेडेगाव हे विकासापासून कोसो दूर आहेत. मात्र, गतवर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत उच्च विद्याविभूषित, विकासाची जाण असलेला लोकप्रतिनिधी मतदार संघाला निवडून दिल्याने आदिवासी दुर्गम भागातील गावांना विकासाची गती मिळाली आहे. अनेक कामे दुर्गम भागात प्राधान्याने केली जात असून यामुळे दळणवळणाच्या सोयीसुविधांबरोबरच इतर सोयीसुविधाही गावात उपलब्ध होत आहेत. आमदार सिद्धार्थ खरात यांनी डोंगराळ दुर्गम भागातील गावाच्या विकासाला प्राधान्य दिले असून दुर्गम भाग हा तालुक्याशी जोडला जावा या ठिकाणी येण्या-जाण्याच्या सुविधा व्हाव्यात.त्याच बरोबर इतर सर्व प्राथमिक सुविधा गावात मिळवण्यासाठी आमदार सिद्धार्थ खरात यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. याच आदिवासी दुर्गम भागातील मेळजानोवरी हे गाव आमदार सिद्धार्थ खरात यांनी दत्तक घेतले आहे. त्यामुळे या दुर्गम भागातील गावातील नागरिकांचे भाग्यच उजळली असल्याच्या प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत.आमदार सिद्धार्थ खरात यांनी हे गाव विकासासाठी दत्तक घेतल्याने या ठिकाणी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच गावाचा सर्वांगीण विकासाला चालना मिळाली आहे. आमदार सिद्धार्थ खरातही गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्राधान्याने लक्ष देत असल्याने गावाचे रोपण बदलण्यास प्रारंभ झाला. नैसर्गिक साधन संपत्तीने व हिरवाईने नटलेल्या मेळजाणरी चे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या पुढाकाराने भाग्य उजळले आहे.


आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन समाजहित डोळ्यासमोर ठेवून सिद्धार्थ खरात यांनी मंत्रालयीन सहसचिव पदाची नोकरी सोडून राजकारणात पाऊल ठेवले. मतदारांनीही त्यांच्यावर विश्वास ठेवून मोठ्या मताधिक्यांने निवडून दिले आहे. आमदार होताच सिद्धार्थ खरात यांनी आपण दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कामाचा सपाटा लावला आहे. त्यामुळे आमदार खरात यांनी मतदार संघातील जनतेच्या मनात घर केले आहे. केवळ गोरगरिबांचे हित समोर ठवून कार्य करणाऱ्या आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त १५ ऑगस्ट रोजी विविध समाजपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विकासपुरूष म्हणून अल्पावधीत नावलौकीक मिळविलेल्या आमदार सिद्धार्थ खरात यांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा तसेच अल्पावधीतच वाचकांच्या पसंतीस उतरलेल्या दैनिक आपला विदर्भच्या वर्धापन दिनास मन:पूर्वक शुभेच्छा....!



# शेतकरी पुत्राची राजकीय एंट्रीने प्रस्थापितांना धडकी

## सामाजिक कार्यात कुटुंबाचे मोठे योगदान :
## परिसरातील उमदे नेतृत्व म्हणून अमोल पळसकर यांची ओळख

डोणगाव आणि पळसकर कुटुंबाची ओळख ही परिसरातच नव्हे तर, जिल्हा व जिल्हा बाहेरही आहे. डोणगाव म्हटले की, सहजच कोणी विचारतो पळसकर का ? या नावाप्रमाणेच पळसकर कुटुंबातील एक उमदे नेतृत्व पुढे आले असून अमोल पळसकर यांच्या रूपाने पळसकर कुटुंबाची नवी ओळख निर्माण झाली आहे. सामाजिक राजकीय धार्मिक आदी सर्वच कामात अमोल पळसकर हे हिरीरीने सहभाग घेत ते काम पूर्ण होईपर्यंत तन मन धनाने सहकार्य करतात.अडल्या नडल्याचे काम पूर्ण करण्यासाठी ते धडपड करतात. एक उत्कृष्ट शेतकरी सामाजिक कार्यकर्ते आणि कृषी क्षेत्रातील सर्वांना परिचित असणारे व्यवसायिक अशी अमोल पळसकर यांची ओळख आहे.सामाजिक धार्मिक कार्यात असलेला सक्रिय सहभाग घेत पाहता परिसरातील सर्वसामान्य ते नेत्यांपर्यंत त्यांना आता लोकप्रतिनिधी म्हणून पाहू लागले आहेत. आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणूक लढवण्यासाठी त्यांना आतापासूनच गळ घातली जात आहे.तर, त्यांच्या राजकीय एन्ट्रीने मात्र, विरोधकांना धडकी भरली आहे. अशी चर्चा परिसरात आहे.








येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे अमोल सुभाष पळसकर हे परिसरातील कृषी क्षेत्रातील व्यवसायत सर्वांच्या परिचित असे नाव आहे. सामाजिक कार्यकर्ता, उत्कृष्ट शेतकरी ते उत्कृष्ट कृषी क्षेत्रातील व्यावसायिक अशी ओळख अमोल पळसकर यांनी केली आहे. कृषी सेवा केंद्राच्या माध्यमातून त्यांनी परिसरातील हजारो शेतकऱ्यांना मार्गदर्शन व मदत करत शेतकऱ्यांचे आर्थिक प्रगती साधण्याचे काम केले आहे. अडल्या नडल्यांचा आधार म्हणून त्यांनी नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे.

कृषी केंद्राच्या माध्यमातून अमोल पळसकर यांनी शेतकऱ्यांशी अतिशय जुळून आहेत व शेतीसंबंधी त्यांना उत्तम ज्ञान आहे. त्यामुळे शेती संदर्भात त्यांची चांगली पकड असून शेतकऱ्याचा सुद्धा त्यांच्यावर अतोनात विश्वास असल्यामुळे आणि पळसकर हे एका शेतकरी कुटुंबातून असल्यामुळे त्यांचा शेतमजूर कुटुंब असो की, शेतकरी कुटुंब यांच्याशी स्नेहाचा संबंध वर्षानुवर्षांपासून कायम आहे. उच्चशिक्षित व शेती व्यवसायाबरोबरच इतर व्यवसायाचे चौकस ज्ञान असल्याने अमोल पळसकर हे सर्वांना योग्य मार्गदर्शन करून त्यांनी सर्वांचे मन जिंकले आहेत.अमोल पळसकर यांना विविध क्षेत्रातला अनुभव असून बँकिंग क्षेत्रामध्ये २०१३ ते १५ पर्यंत नॅशन लाईज बँकेमध्ये अनुभव आहे. त्यानंतर आयोध्या कृषी केंद्र म्हणून त्यांनी स्वतःचा व्यवसाय शेतकऱ्यांना मुबलक सुविधा व शेतीसंबंधी माहिती पोहोचण्यासाठी कृषी सेवा केंद्राच्या माध्यमातून कृषी क्षेत्र क्षेत्रातील व्यवसायात पाऊल टाकले आहे.२०१५ ते २०२१ पर्यंत त्यांनी कृषी केंद्राच्या माध्यमातून अतिशय शेतकऱ्यांना उत्कृष्ट सेवा देऊन कार्य केले. सातत्याने शेतकऱ्यांची जुळून असलेले अमोल सुभाष पळसकर आजही त्यांचा दूध डेरी चा व्यवसाय व बँकिंग क्षेत्रामध्ये काम चालू आहे. त्यांचे धाकटे बंधू राहुल सुभाष पळसकर हे अमोल भाऊच्या खांद्याला खांदा लावून मित्राची व भावाची दोन्ही भूमिका निभावत असतात. वडील सुभाष पाटील पळसकर हे अतिशय मेहनती असून आपली शेती करतात. शेती सोबतच जन संपर्क ही त्यांचा अतिशय चांगला आहे व त्यांचा स्वभावही मनमिळाऊ असल्यामुळे दांडगा संपर्क त्यांचा डोणगाव मध्ये व परिसरात सुद्धा आहे.




### कृषी सेवा केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

उच्च शिक्षित अमोल पळसकर यांनी विविध क्षेत्रात कामाचा अनुभव घेतल्यानंतर शेतकऱ्यांची समस्या लक्षात घेता कृषी क्षेत्रातील व्यवसायात पाऊल टाकले. डोणगाव येथे सन २०१५ मध्ये कृषी सेवा केंद्र सुरू करून शेतकऱ्यांना वाजवी दरात औषधी उपलब्ध करून दिली. त्याचबरोबर शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी व खर्च कमी करण्यासाठी शेतकऱ्या वेळोवेळी मार्गदर्शन केले. कृषी क्षेत्रात काय बदल करणे आवश्यक आहे. कोणती पिके घ्यावी खर्च कसा करावा, याबाबत शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केल्याने शेतकऱ्यांच्या खर्च ५० टक्के कमी झाला आहे. तर उत्पादनात वाढ झाली आहे. परिणामी, शेतकरी वर्ग हा आर्थिक दृष्ट्या समृद्ध होऊ लागल्याने अमोल पळसकर यांचे नाव मार्गदर्शक म्हणून परिसरातील शेतकरी घेऊ लागले आहेत.

### सामाजिक कार्यातही मोलाचे योगदान

डोणगाव येथील सुभाष पळसकर यांचे कुटुंब हे नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहिलेले आहे. सामाजिक कार्याची परंपरा असलेल्या कुटुंबातील अमोल पळसकर यांनी आपल्या वडीलधाऱ्या मंडळीच्या पायावर पाय ठेव सामाजिक कार्याचा वसा पुढे चालविला आहे. सामाजिक दृष्ट्या कोणतेही कार्य असो. त्यामध्ये अमोल पळसकर यांचा चक्रीय सहभाग असतो. ते तन-मन-धनाने सामाजिक कार्यात सहभागी होत असल्याने त्यांची ओळख ही सामाजिक कार्यकर्ते म्हणूनही आहे. शेती व्यवसायाबरोबरच सामाजिक कार्य करणाऱ्या अमोल पळसकर यांच्या या कार्याची राजकीय पक्षांनी दखल घेत त्यांना आतापासूनच आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणूक लढविण्यासाठी गळ घातली जात आहे. अमोल पळसकर यांच्या राजकीय एंट्रीने मात्र, विरोधकांमध्ये चांगलीच धडकी भरली असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.



### उत्कृष्ट शेतकरी म्हणून नावलौकिक

अमोल सुभाष पळसकर हे यांनी सुरुवातीपासून शेती करून एक उत्कृष्ट शेतकरी म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. उच्च शिक्षण घेतलेल्या अमोल पळसकर यांनी सुरुवातीला शेती क्षेत्रातील आव्हाने स्वीकारून शेती क्षेत्रामध्ये बदल केला. बाजारामध्ये काय विकते याची माहिती जाणून घेत शेतीमध्ये बाजारात विकणाऱ्या पिकांना पिके घेण्यास प्राधान्य दिले.परिणामी, कमी खर्चामध्ये जास्त उत्पादन मिळून आर्थिक दृष्ट्या मोठ्या प्रमाणात मदत झाली. त्यांनी आपल्या शेतीच्या विकासाबरोबरच आजुबाजुच्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून कमी खर्चात जास्त उत्पादन घेण्याबाबत प्रोत्साहित केले. शेतीत काय पिकते त्यापेक्षा बाजारात काय विकते. याला महत्त्व देत त्यांनी स्वतःच्या शेती बरोबरच आजुबाजुच्या सर्व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या समृद्ध करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. त्यामुळे अमोल पळसकर यांची ओळख ही उत्कृष्ट शेतकरी ते शेतकऱ्यांचे मार्गदर्शक अशी झाली आहे.

### राजकीय संबंधही मजबूत

परिसरातील ३५ ते ४० गावाची बाजारपेठ असलेल्या पळसकर कुटुंबाचे राजकीय दृष्ट्या मोठा दबदबा आहे. ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये त्यांची भूमिका ही आतापर्यंत निर्णायक राहत आलेली आहे. त्यामुळे त्यांचे सर्वच पक्षाच्या नेत्यांची स्नेहाचे संबंध आहेत. राजकारण फक्त राजकारणा पुरते मर्यादित ठेवून स्नेहाचे संबंध सर्वांशी कायम टिकवून ठेवणाऱ्या पळसकर कुटुंबात राजकीय दृष्ट्या मोठे महत्त्व आहे. आता होऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये जिल्हा परिषद सदस्य म्हणून अमोल पळसकर यांच्याकडे पाहिले जात आहे.सामाजिक धार्मिक व राजकीय अशा सर्वच बाजू ने व सर्वांसोबत स्नेहाचे संबंध असल्याने अमोल पळसकर यांची निवडणुकीमध्ये बाजुही मजबूत असल्याची चर्चा जिल्हा परिषद सर्कलमध्ये होत आहे.उच्च शिक्षण घेतलेला युवक राजकीय क्षेत्रात आल्यानंतर विकासाला वाव मिळेल. अशी अपेक्षाही सर्कलमधील मतदारांमध्ये व्यक्त केली जात आहे. अमोल पळसकर यांच्याकडे भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणून पाहले जात आहे.

### होतकरू विद्यार्थ्यांना मोलाची मदत

विज्ञान युगात टिकण्यासाठी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र, ग्रामीण भागात आजही गोरगरिबांची मुले शिक्षणाकडे दुर्लक्ष करीत आहेत. आर्थिक अडचण, पाल्यांचे दुर्लक्ष आदी कारणामुळे ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबातील अनेक मुले हे शैक्षणिक दृष्ट्या हुशार असतानाही केवळ दुर्लक्षितपणामुळे शिक्षणापासून वंचित राहतात आहेत.त्यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी, त्यांना शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत व्हावी. या उदात्त हेतूने अमोल पळसकर यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक आर्थिक मदत म्हणून प्रत्येक वर्षी एका विद्यार्थ्याला पाच हजार रुपयाची मदत जाहीर करून ती दिली जात आहे. अमोल पळसकर यांची ही पाच हजाराची मदत विद्यार्थ्यांसाठी लाखमोलाची ठरत असून गोरगरीब मुलांना या मदतीमुळे शिक्षणाची गोडी निर्माण लागत आहे. त्याचबरोबर शिक्षणाचे महत्त्व ही समजले जात असल्याने अनेक होतकरू मुलं हे मुलांना ही मदत लाखमोलाची ठरत आहे. सामाजिक धार्मिक कार्यात सतत अग्रेसर राहत असलेले अमोल पळसकर यांनी मुलांसाठी सुरू केलेल्या शैक्षणिक मदतीने चिमुकल्यामध्ये शिक्षणाची गोडी लागत असून ही मदत त्यांच्यासाठी लाखमोलाची ठरत आहे या स्तुत्य उपक्रमाबद्दल अमोल पळसकर यांचे परिसरात कौतुक होत आहे. स्वातंत्र्य दिन व दैनिक आपला विदर्भ वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा-







**शुभेच्छुक –अमोल सुभाष पळसकर**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फ़क्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# विकासाची दूरदृष्टी असणारे उमदे नेतृत्व; गोपाल आखाडे








नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी थेट राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार यांची भेट..!

शेतकरी कुटुंब म्हटलं की, संस्काराबरोबर संकटाचासामना करण्याचे बळ वडीलधारी मंडळीकडून मिळाले. प्रत्येक संकटाशी आणि वेळेला सामोरे जाण्याची, त्याचबरोबर परिस्थिती नुसार निर्णय घेण्याची क्षमता निर्माण झाली. यातून सामाजिक,राजकीय,धार्मिक, संस्काराची बिजरोपण होत शेतीबरोबर सामाजिक, राजकीय क्षेत्रात पदार्पण झाले. घराला मुळातचशेतीचा वारसा असल्याने शेती क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबविण्याची प्रेरणा आई वडिलांकडून मिळाली. आई वडिलांनी कठीण काळात घेतलेली अपार मेहनत वारंवार डोळ्यासमोर उभी राहत आली. आणि या मेहनतीने अपार कष्ट करण्याची प्रेरणा मिळाली. प्रचंड मेहनत हा एक छंद झाला आहे. यातूनच जीवनाला नवी दिशा मिळाली.असे बहुआयामी व्यक्तीमत्व गोपाल सुभाषराव आखाडे पाटील डोणगाव परिसरात आज रोजी राजकीय,सामाजिक,धार्मिक अशा सर्वच क्षेत्रात आज रोजी हिऱ्या सारखे चमकत आहे.

उत्कृष्ट शेतकरी ते राजकीय पाऊलछत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्यासह सर्वच महापुरुषांच्या विचारांचा उज्वल वारसा घेत तसेच अठरा पगड जातींना सोबत घेऊन छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांनी केलेल्या राज्य कारावर व्याख्यानातून प्रकाश टाकला आहे. तसेच प्रायव्हेट स्कुल वरती कमी पगारात नोकरी करणे अवघड असल्यामुळे आणि पर्मानंटची हमी नसल्याने पुढे प्रायव्हेट जॉब सोडून स्वत:च्या मालकीचे वॉटर सर्व्हिसिंग सुरू करून व्यवसायात पाऊल टाकले. याव्यवसायातूनही गोपाल आखाडे यांनी आपल्या कौशल्याने अल्पावधीतच नाव कमाविले. मात्र, समाज कार्याचावसा घेतलेल्या गोपाल भाऊं या व्यवसायात जास्तकाळ रमले नाहीत. त्यांनी समाजकार्य करून अनेकांना न्याय देण्याचे काम केले.शेती क्षेत्रा सोबत समाजकार्य केले. मात्र समाज कार्याला राजकारणाची जोड आवश्यक असल्याने त्यांनी राजकीय क्षेत्रातील चाणाक्ष तब्बल ५५ वर्षांच्यावर राजकीय क्षेत्रात सर्वच क्षेत्रावर आपले कर्तुत्वाने कमावणारे, शेती क्षेत्राची आवड असणारे, आणि देशाचे कृषी मंत्री राहीलेले शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खा. शरदचंद्र पवार यांच्या विचाराने प्रभावित होऊन राजकारणात पर्दापन करीत जनतेची कामे करण्याचा धडाका लावला. शांत, संयमी कर्तुत्वान गोपाल पाटील आखाडे सर्वच क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शेतकऱ्यांचा मार्गदर्शक पारंपरिक पद्धतीने शेती केली तर, अपेक्षीत उत्पान मिळणे कठीण आहे. त्यामुळे शेतीला आधुनिकतेची जोड देणे गरजेचे आहे. हिच बाब हेरून शेती क्षेत्रात पारंपरिक शेतीला बाजुला करून अधुनिकीकतेची कास धरली. आधुनिकतेचा फायदा घेत वडिलोपार्जित शेतीला बागायती केले. शेती हीच उत्पन्नाचे एकमेव स्रोत असल्याने शेतीला आधुनिकतेचा जोड देत घरच्या आर्थिक परिस्थितीचा कणा ताठ केला. स्वत: बरोबर इतर शेतकऱ्यांनाही याचा फायदा व्हावा, यासाठी इतर शेतकऱ्यांना विविध कृषी प्रदर्शनीच्या भेटीला नेले. नवनवीन पिकांचा प्रयोग करून इतरत्र शेतकऱ्यांना त्याची माहिती देऊन त्यांच्याही जीवनात नवक्रांती घडवण्याचा प्रयत्न सतत सुरू ठेवला आहे. आपण मोठे होत असताना आपल्या सोबतची मंडळी नक्कीच मोठी व्हावी. यापेक्षा कुठली भक्ती मोठी नाही हीच भावना मनात बाळगून कार्याला प्राधान्य देत सोबतच्या शेतकरी व इतरांना मदतीचा व मार्गदर्शन करून मोठे करण्याचा प्रयत्न गोपाल भाऊंचा राहिला आहे.

**आमदार सिद्धार्थ खरात यांचा विजयात मोलाची भूमिका**

विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना विधानसभागृहात पाठविण्यासाठी गोपाल आखाडे पाटील यांनी आ.सिद्धार्थ खरात यांच्या खांद्याला खांदा लावून रात्रंदिवस अपार मेहनत घेत, रक्ताचे पाणी करून रात्रंदिवस एक करून, प्रस्थापितांच्या विरोधात जाऊन एक महत्त्वाची भूमिका बजावली. आमदार सिद्धार्थ खरात यांच्या विजयामध्ये मोलाचे भूमिका त्यांची राहिली आहे. प्रस्थापित सत्ताधाऱ्यांच्या दबावामुळे कार्यकर्ते प्रचाराला समोर येत नसताना गोपाल सुभाषराव आखाडे यांनी रोखठोक भूमिका घेत घटक पक्षाच्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी सिद्धार्थ खरात यांच्या प्रचारार्थ राजकीय मैदानात उतरले आणि प्रचंड मेहनतीने व सर्वांच्या सहकार्याने आमदार सिद्धार्थ खरात यांना गुलाल लावून विजय खेचून आणला. सदर कार्याची दखल घेत पक्षाच्या वरिष्ठांनी गोपाल आखाडे यांच्या गळ्यात राष्ट्रवादी युवक काँग्रेस बुलढाणा जिल्हा अध्यक्ष पदाची माळ टाकली. मिळालेल्या जबाबदारीचे सोने करून त्यांची जिल्ह्याच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका निभाविणाऱ्या डोणगाव जिल्हा परिषद सर्कलची ओळख आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत.राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या डोणगाव ग्रामपंचायतचे गाव हे परिसरातील तब्बल ३५ ते ४० गावाची बाजारपेठ आहे. डोणगाव गावाचा विस्तारही झपाट्याने होत आहे. डोणगाव गावा बरोबरच डोणगाव सर्कलच्या विकासाला गती देण्यासाठी विकासाची जाण असलेले व सर्वांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व म्हणून राजकारणातील उमदे नेतृत्व म्हणून गोपाल आखाडे यांची ओळख आहे. आपल्या कार्यकर्तुत्वाच्या बळावर त्यांनी गावापासून ते जिल्हास्तरावर आपली वेगळी छाप उमटविली आहे. सर्कलच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी राजकारणातील उमदे नेतृत्व असलेले गोपाल पाटील आखाडे यांच्याकडे सर्कलचे प्रतिनिधी म्हणून पाहिले जात असून मतदारसंघातील राजकीय पकड अधिकच मजबूत होऊन खऱ्या अर्थाने सक्रिय राजकारणाला सुरुवात झाली.

**सामाजिक कार्यात सिंहाचा वाटा**

मराठ्यांना आरक्षण देण्यात यावे, या मागणीसाठी मराठा आंदोलक अंतरवाली सराटी येथील मराठा योद्धा जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर झालेल्या भ्याड हल्याप्रकरणी डोणगावमध्ये सर्व समजबंधवाना संघटित करून डोणगाव कडकडीत बंद ठेवण्यात सिंहाचा वाटा राहिला आहे. प्राथमिक शिक्षण घेताना शिक्षक बंडू पांडव यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास अक्षरशः डोळ्यासमोर उभा केला.त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आवड आणखीन वाढली.महाराजांची प्रेरणा घेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यावर शिववाख्याने देत महाराजांच्या विचारांचा जागर केला. तेथूनच व सर्व समाजातील महापुरुष यांची कार्य हळूहळू समोर लक्षात येत गेले. तिथूनच सर्व समाज घटकांसाठी आपणही जन्म घेतल्यानंतर समाजाचे देणे लागतो. या दृष्टीने पुढे सुलतानपूर येथील डॉ. आर्यन लाहोटी ग्रुप ऑफ कॉलेजेस याठिकाणी असताना कॉलेजला कुठलाही कार्यक्रम असला तर भाषणासाठी एकच नाव समोर यायचे ते म्हणजे गोपाल सुभाषराव आखाडे आणि याच ठिकाणाहून त्यांच्या शिवचरित्र व्याख्यानाची सुरुवात झाली. पहिले व्याख्यान लोणार तालुक्यातील वझर आघाव या ठिकाणी झाले. दुसरे देऊळगाव मही येथे झाले. नंतर जिजामाता मित्र मंडळाचे डोणगाव चे अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम बाजड यांनी डोणगाव येथे भव्यदिव्य शिवचरित्र व्याख्यान कार्यक्रम घेतला. पुढे त्यांच्या आयुष्याची दिशा ही बदलत आज राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाप्रमुख पर्यंत येऊन ठेपली आहे. येथून पुढच्या काळात शेतकरी नेते हा ब्रँड समोर आला. खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या हिताचा नेता म्हणून त्यांचे नाव समोर आले आहे.

**सर्वसामान्याचापक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसला प्राधान्य**

राजकारणातील चाणक्य म्हणून संबोधले जाणारे तसेच राजकारणामध्ये सदैव तत्पर असणारे व निवडणुकीचा निकाल जो काही असेल तो जनमत समजून दुसऱ्याच दिवशी शेतकऱ्यांच्या बांधावर उभा राहणारा नेता असलेल्या आदरणीय व्यक्तीमत्व शरदचंद्र पवार यांच्या विचाराने प्रभावित होऊन व राष्ट्रवादी काँग्रेसची सर्वांना सोबत घेऊन कोणताही भेदभाव न करता केवळ कार्य कर्तुत्वाला प्राधान्य देणारा पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसची ओळख आहे. त्याचप्रमाणे शेती क्षेत्रात घडून आणलेले अमुलाग्र बदल व कृषी विज्ञान केंद्र, बारामतीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना नवनवीन पिकांची उपलब्धता निर्माण झाल्याने शेतकऱ्यांचा परिणामी मोठ्या प्रमाणात विकास झाल्याचे प्रामुख्याने निदर्शनास आले. त्याचप्रमाणे साहेबांची शेतकऱ्याप्रती असलेली तत्परता या सर्व गोष्टींचा विचार करून तसेच राजकारणातील चाणाक्ष असलेल्या, शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेवून शेतकऱ्यांच्या विकासासाठी सतत लढत असलेल्या नेत्याच्या मार्गदर्शनात काम करण्याची आवड असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला प्राधान्य दिले असल्याची माहिती

## एक बहुआयामी व्यक्तीमत्व : गोपाल पाटील आखाडे

जनतेकडून त्यांना प्रथम क्रमांकाची पसंती मिळत आहे. खासदार शरदचंद्र पवार यांचे विश्वासू म्हणून ते ओळखले जात आहेत.

राजकारणातील कोणताही वारसा नसताना केवळ स्व कर्तुत्वाच्या बळावर आणि सामाजिक कार्याने झपाटलेल्या येथील उत्कृष्ट शेतकरी ते राजकारणातील उमदे नेतृत्व म्हणून गोपाल पाटील आखाडे यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यांनी समाजकार्याच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला न्याय देण्याचे काम केले आहे. गोपाल आखाडे यांची गोरगरिबांसाठी असलेली तळमळ पाहून राजकारणातील चाणाक्ष असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा खासदार शरदचंद्र पवार यांनी त्यांच्यावर विश्वास टाकून जिल्ह्याच्या युवा संघटनेची जबाबदारी दिली आहे. गोपाल आखाडे यांनीही आपल्यावर टाकलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांचे विश्वास संपादन केला आहे. नुकत्याच परिसरात झालेल्या अतिवृष्टीच्या नुकसानीबाबत राष्ट्रवादी काँग्रेस युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहणारे गोपाल आखाडे यांनी थेट शरदचंद्र पवार खासदार यांची भेट घेत त्यांना परिसरातील नुकसानी बाबत माहिती देत तात्काळ मदत देण्याची मागणी केली. गोपाल आखाडे यांची शेतकऱ्यांप्रती असलेली तळमळ पाहून खासदार शरदचंद्र पवार यांनीही तत्काळ दखल घेत मुख्यमंत्री यांना पत्र लिहीत मदतीसाठी मदत करण्याचे आवाहन केले



अचानक आलेल्या पावसामुळे झालेले नुकसान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करताना खासदार निलेश लंके सोबत चर्चा..!



विधानसभा निवडणुकी दरम्यान आमदार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचारार्थ..!

शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी दिली आहे.समाजकारण करताना लोकांची कामे करण्यासाठी प्रशासनावर राजकीय पाठबळ असल्याशिवाय प्रशासनातील कामे होत नव्हती आणि मग अशातच एके दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव पंकज पळसकर यांच्याशी चर्चा करताना त्यांनी राजकारणामध्ये येण्याची गळ घातली. मुळातच शरदचंद्र पवार साहेबांवर असलेला दृढ विश्वास या सर्व गोष्टी लक्षात घेता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांमध्ये तालुका कार्याध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष प्रदेश उपाध्यक्ष भास्करराव काळे यांच्या नेतृत्वात पक्षप्रवेश घेतला. आज रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारावर विश्वास ठेवून व विचाराने सर्वसामान्य जनतेची कामे करण्यास प्राधान्य दिले. सामाजिक, राजकीय, यासह सर्वच क्षेत्रात करीत असलेल्या कामामुळे एक वेगळे समाधान मिळत आले आहे. सर्वसामान्यांच्या चेहऱ्यांच्या फुललेले स्मितहास्य ही एक काम करण्यासाठी उर्जा मिळत आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यासह वरिष्ठांच्या मार्गदर्शनात काम करताना अनेक बाबी शिकायला मिळाल्या आहेत. जबाबदारीने कामाला प्राधान्य देऊन ते पूर्णत्वास नेले आहेत.यापुढेही सर्वसामान्य गोरगरीब जनतेची कामे करण्याला प्राधान्य राहिल, अशी प्रतिक्रिया शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हाध्यक्ष गोपाल सुभाषराव आखाडे यांनी दिली आहे.




आई-वडिलांकडून समाजकार्याची प्रेरणा शेतकरी कुटुंब असल्याने सर्वांना सोबत घेऊन चालवण्याचा वारसा पूर्वीपासूनच लाभलेला आहे. आई-वडिलांना समाजाप्रती असलेली आपुलकीने यामध्ये आणखीच भर घातली आहे. तसेच वडिलांनी कांचनगंगा हिंदू स्मशानभूमी येथे दिलेले योगदान दिल्याने स्मशान भूमीचा कायापालट झाला आहे. त्याचप्रमाणे २०१२ च्या पडलेल्या दुष्काळामध्ये वडिलांनी रात्री बेरात्री स्मशान भूमी मध्यें थांबून पाण्याची सुविधा निर्माण करून दिली. त्याचप्रमाणे रात्री बे रात्री लाईट जात असल्याने लोकांना मोठी अडचण होत होती. अशात त्यांनी स्वतःच्या जिवाची पर्वा न करता रात्री बे रात्री रोहित्रावर चढून विद्युत पुरवठा सुरळीत केला आहे. सर्वसामान्य जनतेची पाण्यासाठी होणारी सहोलपट थांबवून पाण्याची सुविधा निर्माण करून दिली. स्मशानभूमी समितीमध्ये असताना वडिलांनी केलेला विकासात्मक बदल सकारात्मक उर्जा देणारा ठरला.त्यामुळे स्वत:ही समाजकार्यात झोकून दिले. स्मशानभूमित सुधारणा समितीमध्ये असलेले वडिलांना आजारपणामुळे वेळ देणे शक्य नसल्याने ती जबाबदारी माझ्या खांद्यावरती आली आणि सहाजिकच तेथून पुढे समाजकार्याची जास्त आवड निर्माण झाली व लोकांप्रती स्वतःला वाहून घेणे हेच एकमेव ध्येय राहिले आहे.

**अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी सतत पाठपुरावा**

मेहकर तालुक्यात २५ व २६ जून रोजी झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने तालुक्यातील सर्वाधिक नुकसान झाले होते.मेहकर तालुक्यात तब्बल ६५ हजार ६०१ हेक्टर वरील पिकांची प्रचंड नुकसान झाल्याने शेतकरी हतबल झाला होता. त्यानंतर पंधरा दिवसांनी पुन्हा अतिवृष्टी झाल्याने नैसर्गिक संकटाने शेतकऱ्यांसमोर जीवनमरणाचा प्रश्न उभा राहिला. नैसर्गिक संकटामुळे उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे युवक जिल्हाध्यक्ष गोपाल पाटील आखाडे यांनी याबाबत केंद्रीय माजी कृषिमंत्री शरदचंद्र पवार यांच्याकडे पाठपुरावा करून तात्काळ आर्थिक निधी मिळवून देण्याची मागणी केली होती. सदर मागणीची दखल घेत केंद्रीय माजी कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांनी मुख्यमंत्री यांना पत्र लिहून शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्यासाठी पाठपुरावा केला. राष्ट्रवादीच्या मागणीची दखल घेत शासनाच्या वतीने तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना ६६ कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. विशेष बाब म्हणजे यासाठी डोणगाव येथील युवा कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार गटाचे युवक जिल्हाध्यक्ष गोपाल पाटील आखाडे यांनी सर्वप्रथम मागणी करून याबाबत केंद्रीय माजी कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांच्याकडे मागणी केली. केंद्रीय माजी कृषीमंत्री तथा खासदार शरदचंद्र पवार यांनी सदर मागणीची दखल घेत शेतकऱ्यांना तात्काळ मदत करण्याची मुख्यमंत्र्यांना पत्र दिले. राष्ट्रवादीच्या काँग्रेसच्याा या मागणीची दखल घेत राज्य शासनाच्या वतीने तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना तब्बल ६६ कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. सदर निधी लवकरच शेतकऱ्यांचा खात्यात जमा करण्यासाठी सुद्धा पाठपुरावा राष्ट्रवादी काँग्रेसकडून केला जात आहे.

आहे. शेतकऱ्यांच्या समस्या बरोबर गोरगरिबांच्या इतर समस्या लावण्यासाठी गोपाल आखाडे हे जीवाचे रान करत सर्वसामान्य गोरगरिबांसाठी २४ तास तत्पर असल्याने आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये त्यांच्याकडे सर्कलचे प्रतिनिधी म्हणून पाहिले जात आहे. सर्कलमध्ये त्यांना प्रथम क्रमांकाची पसंती मिळत आहे. आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद सर्कलचे ते प्रतिनिधित्व करतील अशा प्रतिक्रिया मतदारसंघातील मतदारांकडून व्यक्त केल्या जात आहेत.एक युवा नेतृत्व, विकासाची जाण, कार्य कर्तृत्वावर उंची गाठत असलेल्या उमद्या नेतृत्वाला जिल्हा परिषद सदस्य पदाची नेतृत्व करण्याची संधी आम्ही देणार असल्याच्या प्रतिक्रिया सर्कल मधील मतदारांकडून व्यक्त केल्या जात आहेत... स्वातंत्र्य दिन व दैनिक आपला विदर्भ वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!


# तलाठी अमोलचे कृषी क्षेत्रात अनमोल कार्य



पालकमंत्री मकरंद पाटील जाधव यांच्या हस्ते सन्मान

## शेतकऱ्यांचा विकास हाच पती-पत्नीचा ध्यास : उत्कृष्ट कार्याबद्दल पालकमंत्री पाटील यांच्याहस्ते सन्मान





हरीत क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या विचाराने प्रभावित होऊन तलाठी अमोल राठोड यांनी शेती क्षेत्राचा आणि अन्नदात्या शेतकऱ्यांचा विकास करण्याचा ध्यास घेतला. संपूर्ण कुटुंबाला पोलीस प्रशासन अर्थात संरक्षण विभागाची पार्श्वभूमी लाभलेली असताना तलाठी अमोल राठोड यांनी कृषी क्षेत्रात नोकरी करण्याला पसंती देत शेतकऱ्यांच्या विकास करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले आहे. एवढेच नव्हे तर तलाठी अमोल राठोड यांची पत्नी सिमा ही सुद्धा तलाठी असून दोघेही पती-पत्नी शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करून शेतकऱ्यांचा विकास हाच ध्यास घेऊन आपले कर्तव्य पार पाडीत असल्याने राठोड यांचे कार्य शेतकऱ्यांसाठी अनमोल ठरत आहेत.

तलाठी अमोल हिरालाल राठोड यांच्या कुटुंबाला पोलीस प्रशासनातील नोकरीची पार्श्वभूमी लाभलेली आहे.वडील सेवानिवृत्त एएसआय असून भाऊ पोलीस प्रशासनात कार्यरत आहेत. तलाठी अमोल यांनाही पोलीस प्रशासनातील नोकरीमध्ये करिअर करण्याची संधी होती.मात्र, अमोल राठोड यांनी अन्नदाता शेतकऱ्यांसाठी आपल्या हातून काम करण्याला प्राधान्य दिले. शेतकऱ्यांच्या विकासात आपला खारीचा वाटा असावा. हा उदात्त हेतू ठेवून अमोल राठोड यांनी सन २००९ मध्ये तलाठी म्हणून कार्य सुरू केले. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या विचाराने प्रभावित होत शेती क्षेत्रातील नोकरीला प्राधान्य दिले. नोकरी करताना ती स्वतःपूर्ती न करता आपल्या नोकरीचा सर्वसामान्य शेतकऱ्यांना फायदा व्हावा, त्यांचा विकास व्हावा हा उदात्त हेतू ठेवून २००९ पासून तलाठी म्हणून कार्य सुरू केले. सुरुवातीपासूनच त्यांनी शेतकरी व शेतकऱ्यांचे हित जोपासत काम केल्याने ते हजारो शेतकऱ्यांचे विकासाचे ते वाटेकरी झाले आहेत. शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या सेवेसाठी २४ तास तत्पर राहून ते पती-पत्नी कार्य करीत असल्याने त्यांचे कार्य हे शेती क्षेत्रासाठी व शेतकऱ्यांसाठी अनमोल ठरले आहे.




### कुटुंबाला पोलीस सेवेची पार्श्वभूमी

तलाठी अमोल राठोड यांचे वडील हिरालाल मेरचंद राठोड १९८७ मध्ये पोलीस खात्यात नोकरीला लागलेत. त्यांचे आई इंदू हिरालाल राठोड ह्या गृहिणी आहेत. वडील व आईच्या संस्काराने अमोल राठोड यांच्या बहिण भाऊ अशा सर्वच कुटुंबावर सुसंस्कार झाले. वडिलाप्रमाणेच अमोल राठोड यांच्या भावाने पोलीस प्रशासनात नोकरी करण्याला प्राधान्य दिले. तलाठी अमोल हिरालाल राठोड यांनी ग्रॅज्युएशन झाल्यानंतर कृषी क्षेत्रातील नोकरीला प्राधान्य देत तलाठी म्हणून सेवा सुरू केली. अन्नदात्या शेतकऱ्यांचा विकास व्हावा, गोरगरीब शेतकऱ्यांना विकासाच्या प्रवाहात आणावे, या उदात्त हेतूने अमोल राठोड यांनी सन २००९ मध्ये तलाठी म्हणून आपली सेवा सुरू केली. शेती क्षेत्राची आणि गोरगरीब शेतकऱ्यांची योग्य मार्गदर्शन करून शेती शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती करण्यासाठी मोलाची भूमिका बजावत आहेत. पती अमोल राठोड यांच्याप्रमाणेच त्यांची पत्नी सीमा राठोड ह्याही तलाठी म्हणून कार्यरत असून आपल्या नोकरीच्या सेवेत त्यांनी अनेक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून त्यांना पारंपारिक शेती न करता आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी प्रोत्साहित केले आहे. त्यांच्या या मार्गदर्शनामुळे शेतकऱ्यांनी शेतात काय पिकते यापेक्षा बाजारात काय विकते, याला महत्त्व देत उत्पन्न घेण्यास प्रारंभ केल्याने राठोड दांपत्याचे कार्य हे अनमोल ठरले आहे. त्यांच्या उदात्त हेतूने अनेक शेतकऱ्यांच्या जीवनात खुशीयाली बहरली आहे.

### उत्कृष्ट कर्मचारी म्हणून नावलौकिक

तलाठी अमोल राठोड यांनी शेती व शेतकऱ्यांच्या प्रेमापोटी शेती व्यवसायाशी निगडित असलेली तलाठ्यांची नोकरी स्वीकारली. शेतकऱ्यांच्या सेवेला प्राधान्य दिले. सुरुवातीपासूनच शेती आणि शेतकऱ्यांची जिव्हाळा असल्याने तलाठी अमोल राठोड यांनी उत्कृष्ट कार्य करत प्रत्येक योजनेचा लाभ शेतकऱ्यापर्यंत पोहोचविला आहे. शेतकऱ्यांना वारंवार मार्गदर्शन करून आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी प्रोत्साहित केले. शासनाच्या प्रत्येक योजनेचा उद्देश सार्थकी लावण्यासाठी ती योजना शेतकऱ्यांना समजावून सांगून १०० टक्के अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले. आदी कार्यामुळे तलाठी अमोल राठोड यांचे नाव शेतकऱ्यांमध्ये आदराचे तर आहेच त्याचबरोबर प्रशासन दरबारी एक उत्कृष्ट कर्मचारी म्हणूनही तलाठी अमोल राठोड यांचा नावलौकिक आहे. नावाप्रमाणे अनमोल कार्य अमोल राठोड यांचे राहिले असल्याने अमोल राठोड यांची उत्कृष्ट कर्मचारी म्हणून ओळख निर्माण झाली आहे. महसूल विभागातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यासह महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्याहस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

### डोणगाव येथे मार्गदर्शन शिबिर

शेती क्षेत्राशी निगडित विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी शासनाच्या वतीने वारंवार शिबिरे आयोजित करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. डोणगाव येथे तीन पेक्षा जास्त मार्गदर्शन शिबिर घेत शेतकऱ्यांना विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनातून अनेक शेतकऱ्यांनी पारंपारिक शेतीला फाटा देत आधुनिक पद्धतीने शेती करण्यास प्रारंभ केला. अतिवृष्टीच्या काळात तलाठी अमोल राठोड यांनी उत्कृष्ट कामगिरी करून शेतकऱ्यांना नैसर्गिक स संकटातून बाहेर काढण्यासाठी मार्गदर्शन करण्याबरोबरच शासनाचा लाभ तात्काळ पोहोचवण्यासाठी मोलाची भूमिका बजावली आहे. आपल्या उत्कृष्ट कार्याने त्यांना शासन दरबारी कर्तव्य दक्ष तलाठी म्हणून ओळखले जाते.

### उत्कृष्ट कार्याची प्रशासनाकडून दखल

तलाठी अमोल राठोड यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत नुकतेच पालकमंत्री मकरंद पाटील व जिल्हाधिकारी किरण पाटील व पोलीस अधीक्षक तांबे यांच्या हस्ते अमोल राठोड यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. डोणगाव येथील तलाठी अमोल राठोड हे २००९ पासून तलाठी म्हणून कार्यरत असून त्यांनी आपल्या कार्यकाळात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून समृद्ध बनवण्याचे काम केले आहे.त्याचबरोबर शासनाच्या विविध योजना पारदर्शकपणे राबवून त्याचा शेतकऱ्यांना फायदा करून दिला आहे. त्याचबरोबर शासनाचा उद्देशही सफल केला आहे.विविध ठिकाणी त्यांनी नोकरीच्या काळात उत्कृष्ट ठेवा बजावली आहे. प्रशासकीय कार्यातही अमोल राठोड हे कर्तव्यदक्ष कर्मचारी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेत त्यांना उत्कृष्ट तलाठी म्हणून बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील, जिल्हाधिकारी किरण पाटील,जिल्हा पोलीस अधीक्षक तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्कृष्ट कार्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे...!







## राजकारण आणि समाजकारणाची सांगड घालणारे व्यक्तिमत्व

# प्रा.डॉ. सचिन जाधव



## सामाजिक कार्यात अग्रेसर : स्नेहाची ओळख हिच सर्वत्र ओळख



कीर्तनकारांचा सन्मान करताना प्रा. डॉ. सचिन भाऊ जाधव युवा सेनेचे जिल्हा अध्यक्ष ऋषी भाऊ जाधव..!






मा.ना. श्री.प्रतापराव जाधव मंत्री आयुष (स्वातंत्र प्रभार) आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री भारत सरकार प्रतापराव जाधव यांच्या सोबत प्रा.डॉ. सचिन विजयराव जाधव व मान्यवर..!



सन्मान कीर्तनकारांचा..!



सत्कार करताना ना. श्री. प्रतापराव जाधव मंत्री आयुष (स्वातंत्र प्रभार) आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री भारत सरकार



ना. श्री. प्रतापराव जाधव पांडूरंगाचे दर्शन घेतेवेळी

हिंदुह्य सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणीप्रमाणेच राजकारणाला समाजकारणाची जोड देत सर्व समाज बांधवांचे मन जिंकून सर्वांशी हितसंबंध जोपासणारे राजकीय, सामाजिक कार्यकर्ते म्हणून प्रा.डॉ.सचिन विजयराव जाधव यांची ओळख आहे. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या विजयातही पुतणे म्हणून प्रा.डॉ. सचिन विजयराव जाधव यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. काकांनी राजकारण करावे आणि पुतणे सचिन जाधव यांनी समाजकारण सांभाळावे,अशी राजकारणाची सांगड घालून राजकारणाबरोबर समाजकारण करणारे डॉ.सचिन जाधव यांचे जिल्ह्यात सर्वांशी हितसंबंध जोपासणारे ही व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख आहे.

जाधव कुटुंब हे मादणी येथील ग्रामीण भागातील कुटुंब आहे. ग्रामीण भागातील सर्व पार्श्वभूमी असल्याने सर्वांसोबत राहणे, सर्वांना समजावून घेणे,मदत करणे हा वारसा त्यांना वडिलोपार्जित मिळाला आहे.जमीनदार कुटुंब असल्याने या कुटुंबाची सुरुवातीपासूनच परोपकार करण्याची वृत्ती आहे. समाजात राहताना गोरगरीबांना मदत करून त्यांची कामे मार्गी लावणे, पूर्ण करणे हा वारसा प्रा. डॉ.सचिन जाधव यांचे आजोबा गणपतराव जाधव यांच्यापासूनच जाधव कुटुंबाला लाभलेला आहे. त्यांच्या कुटुंबाचा वारसा पुढे डॉ.सचिन जाधव यांचे वडील विजयराव जाधव व काका केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी सुरू ठेवला. समाजकारण करताना जनतेचा विश्वास त्यांनी संपादन केला. समाजकारण करतानाच नकळतच गोरगरिबांच्या आग्रहास्तव डॉ. सचिन जाधव यांचे काका प्रतापराव जाधव यांचा राजकारणात प्रवेश झाला. लोकांनी एक विश्वासू व्यक्तिमत्त्व म्हणून सुरुवातीपासूनच प्रतापराव जाधव यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना तब्बल २५ वर्षांपेक्षा जास्त काळापासून राजकारणात कायम ठेवून प्रत्येक वेळेस प्रचंड मताधिक्यने निवडून दिले आहे. जाधव कुटुंबांनीही गोरगरीब जनतेचे समाजातील सर्वांचा विश्वास जोपासत सर्वांना सोबत घेऊन विकासाचे राजकारण केले. परिणामी, जाधव कुटुंबाची राजकीय वाटचाल ही प्रत्येक वेळेस वरचढ राहिली आहे. राजकारणातील एक विश्वासू नाव म्हणून जाधव कुटुंब पुढे आले आहे. त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची दखल घेत प्रतापराव जाधव यांना केंद्रीय मंत्री पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आणि केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनीही ती जबाबदारी यशस्वी पार पाडत आहेत. आपल्याला मिळालेल्या पदाच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला मतदारसंघाच्या विकासाबरोबरच संपूर्ण राज्यात आपल्या पदाचा कसा फायदा होईल याचा जास्तीत जास्त उपयोग करून विकासाला प्राधान्य दिले आहे.प्रा. डॉ.सचिन जाधव यांचे काका असलेले प्रतापराव जाधव यांनी राजकारणाची धुरा सांभाळली तर, मितभाषी व्यक्तिमत्व म्हणून प्रा.डॉ.सचिन विजयराव जाधव यांनी समाजकार्यात स्वतःला वाहून घेत समाजकारणाची जबाबदारी यशस्वी पार पाडली आहे. त्यामुळे जाधव कुटुंबाचे नाव हे बुलढाणा जिल्ह्यातच नव्हे तर, संपूर्ण महाराष्ट्रात आदराने घेतले जाते. जमीनदार कुटुंब, परोपकारी सर्वांना सोबत घेऊन राजकारणाबरोबरच समाजकारण साधणारे व्यक्तिमत्त्व म्हणून प्रा.डॉ.सचिन विजयराव जाधव यांचे नाव घेतले जात असून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनात सर्वांशी हितसंबंध जोपासून सकारात्मक राजकारण करणारे म्हणून डॉक्टर सचिन जाधव यांची ओळख आहे.



### किर्तनकारांच्या सन्मानाचा भव्य गौरव सन्मान सोहळा

सामाजिक, राजकीय कार्यकर्ते अशी ओळख असलेल्या तसेच गोरगरिबांचे कैवारी म्हणून अनेकांना मदतीचा हात देणारे प्रा.डॉ.सचिन विजयराव जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या मित्र मंडळाकडून मेहकर येथे बुलढाणा जिल्ह्यातील कीर्तनकारांचा सन्मान सोहळा भव्य दिव्य स्वरूपात पार पडला. कृषी उत्पन्न बाजार समिती जवळील भूमिपुत्र प्रतापराव जाधव शेतकरी भवनात या विलोभनीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. फटाक्यांची आतिषबाजी करत जिल्ह्यातील ३५० कीर्तनकारांचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी तुकाराम महाराज सखारामपूरकर, दिढे मामा, शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेना प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले, महाराज मंडळी व माजी आमदार संजय रायमुलकर, शशिकांत खेडेकर याची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. तसेच यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बळीराम मापारी, शांताराम दाणे, उल्हासराव जाधव, विजयराव जाधव, बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, राजश्री प्रतापराव जाधव, युवासेनेचे जिल्हाप्रमुख ऋषि जाधव, खरेदी विक्री संस्थेचे अध्यक्ष शत्रुघ्न निकम, मनोज सावजी, शिवसेनेचे तालुका प्रमुख सुरेशतात्या वाळूकर, लोणारचे भगवानराव सुलताने, शहर प्रमुख जयचंद बाठीया, पांडुरंग सरकटे, समाधान साबळे, मायाताई म्हस्के, युवासेनेचे भूषण घोडे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी ३५० कीर्तनकारांना विठ्ठल पांडुरंगाची मूर्ती,स्मृतिचिन्ह आणि वस्त्रे देऊन सन्मानित करण्यात आले. शंभर जोडप्यांच्या हस्ते सर्व कीर्तनकारांचे पूजन करण्यात आले. कीर्तनकार आणि उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.




### केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या विजयात महत्त्वाची भूमिका

सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असणारे प्रा.डॉ.सचिन विजयराव जाधव यांची संपूर्ण मतदारसंघात सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळख आहे. सर्वांशी स्नेहाचे नाते ठेवून समाजकारणाबरोबर राजकारणात राजकारण करणारे म्हणूनही प्रा. डॉ.सचिन जाधव यांना ओळखले जाते. त्यांचे काका केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव राजकारणाची धुरा सांभाळत असताना त्यांच्या मार्गदर्शनात डॉ. सचिन जाधव हे समाजकारणाची धुरा यशस्वीपणे सांभाळत आले आहेत. निवडणुकीच्या काळात डॉ. सचिन विजयराव जाधव यांची भूमिका ही नेहमीच महत्त्वाची ठरत आलेली आहे. आपल्या प्रेमळ स्वभावाने त्यांनी नेहमीच सर्वसामान्यांना मने जिंकून घेत निस्वार्थपणे मतदारांना आपल्याकडे खेचले आहे. त्यामुळे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या विजयात त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली असून विरोधक डॉ.सचिन जाधव यांना राजकीय चाणक्ष म्हणून ओळतात, हे विशेष.

### उत्कृष्ट शेतकरी म्हणून परिसरात नावलौकिक

प्रा.डॉ. सचिन विजयराव जाधव यांचे कुटुंब हे सुरुवातीपासूनच परिसरातील जमीनदार कुटुंब आहे. त्यामुळे त्यांची एक जमिनदार कुटुंब म्हणून ओळख आहे. त्यामुळे जाधव कुटुंबाला परोपकाराची वारसा वडीलधाऱ्या मंडळीकडून मिळालेला आहे. गोरगरिबाची मदत करणे त्यांना त्यांचे अडलेले काम मार्गी लावणे,तसेच सामाजिक कार्यात नेहमीच जाधव कुटुंबाची भूमिका अग्रेसर राहत आलेली आहे. आजोबा गणपतराव जाधव यांच्यानंतर त्यांचे काका केंदीय मंत्री प्रतापराव जाधव वडील विजयराव जाधव यांच्याप्रमाणेच प्रा.डॉ. सचिन जाधव हे समाज कार्याला प्रथम प्राधान्य देत गोरगरिबांची सेवा करण्यातच समाधान मानत असल्याने त्यांचे संपूर्ण जिल्ह्यात सामाजिक कार्यकर्ते व दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून नाव घेतले जाते. तर ओळखीप्रमाणे डॉ. सचिन विजयराव जाधव यांनी आपले आचरविचार ठेवून आपल्या प्रेमळ स्वभावाने सर्वांची मने जिंकून घेतले आहेत. तर, अनेक युवकांना त्यांनी रोजगार उपलब्ध करून देत त्यांना स्वत:च्या पावावर उभे केले आहे. अशा या आगळ्यावेगळ्या व्यक्तिमत्वाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा...!

स्वातंत्र्य दिन व दैनिक आपला विदर्भ वर्धापन दिनानिमित्त खूप खूप शुभेच्छा शुभेच्छुक प्रा. डॉ.सचिन जाधव















स्वातंत्र्य दिनाच्या व
दैनिक आपला विदर्भ
च्या 3 रा
वर्धापनदिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा..
आपला विदर्भ LIVE
शुभेच्छुक.
मा. श्री. पंकज भाऊ पळसकर
राष्ट्रवादी युवक काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश सचिव




स्वातंत्र्य दिनाच्या व
दैनिक आपला विदर्भ
च्या 3 रा
वर्धापनदिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा..
आपला विदर्भ LIVE
शुभेच्छुक.
श्री. मोहन काळे (अभिनेता)




आपला विदर्भ LIVE
स्वातंत्र्य दिन व
दैनिक आपला विदर्भ वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
मा.श्री.निलेश महाजन
माजी उपसभापती लोणार




आपला विदर्भ LIVE
स्वातंत्र्य दिन व
दैनिक आपला विदर्भ वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
मा.श्री.माजी आमदार तोताराम कायंदे




आपला विदर्भ LIVE
स्वातंत्र्य दिन व
दैनिक आपला विदर्भ वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
मा.श्री.शरद भागवतराव वानखेडे
ग्रामपंचायत अधिकारी हिवरा साबळे




स्वातंत्र्य दिनाच्या व
दैनिक आपला विदर्भ
च्या 3 रा
वर्धापनदिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा..
आपला विदर्भ LIVE
शुभेच्छुक.
मा.श्री.उमेश शेवाळे
ग्रामपंचायत अधिकारी




आपला विदर्भ LIVE
स्वातंत्र्य दिन व
दैनिक आपला विदर्भ वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री.दिपक गायकवाड
शिवसेना ठाकरे गट विभाग प्रमुख डोणगाव




स्वातंत्र्य
दिनानिमित्त
सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा...
व दैनिक आपला विदर्भच्या सर्व वाचकांचे
आभार
-शुभेच्छुक-
मा.श्री.देविदास खनपटे
मुख्य संपादक




आपला विदर्भ LIVE
स्वातंत्र्य दिन
व दैनिक आपला विदर्भ वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
पंचगव्य आयुर्वेद निसर्गोपचार
ॲक्युपंक्चर क्लिनिक
A COMPLETE CENTRE FOR SPINE & JOINT PROBLEMS
नाडी परिक्षक, नाभी चिकीत्सक, मर्म चिकीत्सक, एक्यपेशर तज्ञ
मैंबर ऑफ पंचगव्य डॉक्टर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य
डॉ.अतुल नंदेवार
+91 96379 34935
ॲक्युपंक्चर M.D., A.M
पंचगव्य आयुर्वेद A.D.P.T
नेचरोपॅथी D.N.Y.S Sco




स्वातंत्र्य दिन
व दैनिक आपला विदर्भ वर्धापन दिनाच्या
आपला विदर्भ LIVE
हार्दिक शुभेच्छा
चदांबाई गुलमोहर
सरपंच बिबी
भास्कर खुळे
उपसरपंच बिबी
अमोल मोरे
ग्रामपंचायत अधिकारी बिबी


75th
स्वतंत्रता दिवस
व
दैनिक आपला विदर्भ वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
जैन कंपनीचे अधिकृत विक्रेता
श्री लक्ष्मीनारायण ऍग्रो स.डोणगाव
जैन ठिंबक,जैन स्पिंकलर, जैन टिशू , जैन कल्चर
शुभेच्छुक : अधिकृत विक्रेता
अँड रामेश्वर स. पळसकर
मो.9423236188


15TH AUGUST
स्वतंत्रता दिवस
व
दैनिक आपला विदर्भ वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
-शुभेच्छुक-
मा.श्री.ज्ञानेश्वर इरतकर
राष्ट्रवादी काँग्रेस कार्याध्यक्ष मेहकर


स्वतंत्रता दिवस
15TH AUGUST
स्वातंत्र्य दिन व
दैनिक आपला विदर्भ वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
-शुभेच्छुक-
डॉ. प्रविण भुजंगराव टाले
B.A.M.S.C.C.H.O / R.No.I 90083-A
जनरल फिजीशियन व बालरोग तज्ञ
डॉ. अश्विनी प्रविण टाले
B.A.M.S.C.G.O. / R.No.IA 89630
स्त्रिरोग व प्रसूती तज्ञ


आपला विदर्भ LIVE
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा...
दैनिक
आपला विदर्भ
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
एन. एस. बोरकर
(मंडळ अधिकारी, डोगणांव)
अमोल राठोड
(तलाठी डोणगांव भाग.२)
अनुप नरोटे
(तलाठी डोणगांव भाग. १)
पल्लवी गुंठेवार
(तलाठी डोणगांध)
सिमा चव्हाण
(तलाठी डोणगांव)
बी. व्ही. खिल्लारे
(तलाठी आरेगाव)
संदिप परमाळे
(कोतवाल डोणगांव)
संतोष मानवतकर
(कोतवाल डोणगांव)
विजय खरात
(महसुल मित्र)


स्वच्छ गाव, सुंदर गाव, प्रगतीचा ध्यास. थकीत कर भरा, विकासासाठी सहकार्य करा.
निसर्गाचे नियम पाळा, प्लॅस्टिकचा वापर टाळा,सर्वांची साथ,
गावाचा विकास.. ग्रामपंचायत डोणगाव आहे ध्यास
आपला विदर्भ LIVE
15TH AUGUST
स्वतंत्रता दिवस
व
दैनिक आपला विदर्भ
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
मा.श्री.शिवचरण आखाडे
सरपंच डोणगाव ग्रामपंचायत
मा.श्री.विजय दांडगे
ग्रामपंचायत अधिकारी डोणगाव
स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर
उपसरपंच सह सर्व ग्रामपंचायत
सदस्य व कर्मचारी रुंद

# ध्येयवेड्या डॉ. मंगेश पाटील यांनी युवकांच्या रोजगारासाठी उभारले अनेक व्यवसाय

## रुग्णांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवित पाटील हॉस्पिटलची यशस्वी वाटचाल; सामाजिक दायित्वातून मातृभूमीत सेवा देण्याला प्राधान्य





वैद्यकीय शिक्षण घेत केवळ आपल्या शिक्षणापुरते मर्यादित न राहता आपल्या शिक्षणाचा इतरांना फायदा व्हावा, हा उदात्त रुग्णांची सेवा करण्याबरोबरच डॉ. मंगेश बाजड यांनी परिसरातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम केले आहे. वैद्यकीय क्षेत्रात पदवी मिळाल्यानंतर त्यांनी रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा मानून परिसरातील गोरगरीब जनतेला ग्रामीण भागात अत्याधुनिक व मेट्रोसिटी प्रमाणे सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. रुग्ण सेवा करताना नजरेस पडणारे बेरोजगारांची फौज हे मनाला अस्वस्थ करून जात असल्याने डॉ. मंगेश बाजड यांनी बेरोजगारांसाठी पाटील इरिगेशनच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून देत शेतीतही अमुलाग्र बदल करीत शेतकऱ्यांचा विकास करण्याचा ध्यास घेतला आहे.तर, हॉटेल गारवा च्या माध्यमातून बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिले आहेत त्याचबरोबर परिसरातील खवय्यांना रुचकर स्वादिष्ट जेवण उपलब्ध करून देत त्यांच्या मनाची तृप्ती केली जात आहे. पाटील फायनान्स च्या माध्यमातून अनेकांना रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मोलाची भूमिका पार पाडली जात आहे.असे अनेक व्यवसाय उभे करून बेरोजगारांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देत त्यांच्या जगण्याला आधार दिला आहे. त्याचबरोबर परिसरातील मायबाप शेतकऱ्यांना अत्याधुनिक सोयी सुविधा उपलब्ध करून देत शेती शोध क्षेत्रातही अमुलाग्र बदल घडून आणला आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये सुद्धा मोठी प्रगती झाली आहे. एकंदरीत वैद्यकीय क्षेत्राबरोबरच चार भिंतीच्या बाहेर पडल्यानंतरही डॉ. मंगेश बाजड यांची ओळख ही एक देव माणूस म्हणून निर्माण झाली आहे. रुग्णांच्या चेहऱ्यावर हास्य पुरवण्याबरोबरच त्यांनी बेरोजगार व कष्टकरी शेतकऱ्यांच्या जगण्यातही आनंदाची बहर आणली आहे.

डोणगाव हे शहर वजा खेडेगाव आहे. ग्रामपंचायतीचे ठिकाण आहे. मात्र, आजुबाजुचे जवळपास ५० खेडी खेड्यांची सामाजिक, व्यवहारिक बाधिलकी डोणगावशी जुळलेली आहे. व्यवहारिक दृष्ट्या डोणगाव येथील प्रगती झाली. डोणगावमध्ये व्यावसायिक दृष्ट्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध झाल्या. मात्र, आरोग्याच्या दृष्टीने सोयीसुविधा उपलब्ध न झाल्याने आजुबाजुतील गावातील गोरगरीब, मायबाप, शेतकरी, कष्टकरी यांना रुग्णसेवेसाठी मोठी आर्थिक झळा सहन करत इतर ठिकाणी जावे लागत होते.परिणामी रुग्णांचे व रुग्णांच्या नातेवाईकांचे मोठे हाल होत होते. आजारपणा अन् त्यात आर्थिक समस्यांनी त्रस्त झालेल्या गोरगरीब मायबाप जनतेची आपल्या हातून सेवा घडावी हा उदात्त हेतू ठेवून डॉ. मंगेश बाजड व त्यांच्या अर्धांगिनी डॉ. सारिका मंगेश बाजड यांनी सन २०१९ पासून डोणगाव सारख्या ग्रामीण भागात प्रशस्त इमारत उभारून सुसज्ज हॉस्पिटल जनसेवेत सुरू केले आहे. हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देत रुग्णांच्या सेवेला प्राधान्य दिले आहे. ग्रामीण भाग आणि आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या जनतेला परवडेल अशा अत्यल्प दरात सेवा देऊन गोरगरिबांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविले आहे. सामाजिक दायित्व स्वीकारून सुरू केलेल्या जनसेवेला जनतेनेही भरभरून प्रतिसाद देत डॉ. मंगेश बाजड व डॉ. सारिका बाजड यांचा उत्साह वाढविला आहे. डॉ. मंगेश यांच्या पाटील हॉस्पिटलमुळे डोणगावसह परिसरातील तब्बल ५० गावातील जनतेला डोणगाव सारख्या ग्रामीण भागात आणि गावाजवळच सर्व सोयीसुविधा उपलब्ध झाल्याने जनतेची पैसा व वेळेची बचत झाली आहे.त्याचबरोबर अचूक निदान होत असल्याने रुग्णालयात आलेल्या रुग्णांवर योग्यदरात व अचूक उपचार होत असल्याने रुग्णांच्या चेहऱ्यावरही हास्यफुलत असल्याने डॉ.मंगेश बाजड व त्यांच्या अर्धांगिनी डॉ.सारिका बाजड यांनी अल्पावधीतच प्रचंड लोकप्रियता मिळविली आहे.डॉ. मंगेश बाजड म्हणजे डोणगावसह परिसरातील जनतेचे फॅमिली डॉक्टर झाले आहेत. तर, पाटील हॉस्पिटल विश्वासाचे आणि हक्काचे उपचार केंद्र बनले आहे.डॉ.बाजड दांपत्य हे सामाजिक दायित्व स्वीकारून रुग्णांना कमी खर्चात अचूक सेवा देत असल्याने डॉ.मंगेश बाजड यांचे पाटील हॉस्पिटल हे डोणगाव नव्हे तर, डोणगाव परिसरातील खेड्याबरोबरच जिल्ह्यात प्रसिद्ध झाले आहे..

### दुर्गम भागातून व्हिडिओ कॉलद्वारे पेशंट बघण्याची सुविधा

डोणगाव परिसरातील भाग हा दुर्गम भाग आहे. त्यामुळे रुग्ण व रुग्णांच्यानातेवाईकांची समस्या लक्षात घेता पाटील हॉस्पीटलचे संचालक डॉ. मंगेश बाजड व डॉ. सारिका बाजड यांनी रुग्णांसाठी व्हीडीओ कॉलद्वारे पेशंट पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे.सदर अपद्वारे पेशंट चेकअप झाला की प्रिस्क्रिप्शन व्हॉट्स अपला पोहोचते. यामुळे प्रत्येक आजारातील तज्ञ डॉक्टर्सची सेवा रुग्ण घेऊ शकतात. डाटा अनेलीसेसमध्ये विशिष्ट काळात विशिष्ट भागामध्ये कोणत्या आजाराचे पेशंट किती झाले त्यावर कोणती औषधी चांगली काम करते ह्याचे एका क्लिकवर रिपोर्ट मिळतो. ह्यामुळे साथीचे आजार जर असेल तर, फैलाव होण्याआधीच उपाय योजना करायला सोपे होते.एआय सारख्या वैज्ञानिक प्रगती ही सर्वसामान्यांना सहज व सोप्या भाषेत माहिती उपलब्ध करून देत आहे.

ग्राहकांचे हित जोपासत उत्कृष्ट मॅनेजमेंट पाटील अर्बन फायनान्सच्या माध्यमातून गोरगरीब जनता व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज सुविधा उपलब्ध करून देत त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आर्थिक आधार दिला आहे. गोरगरिबांना आर्थिक मदत करून देत आधार देण्याबरोबरच बँकेचे उपाध्यक्ष व व्यवस्थापक जीवन ज्ञानेश्वर बाजड यांनी आपल्यात चाणाक्ष बुद्धीच्या बळावर फायनान्स क्षेत्रात एक नवी ओळख निर्माण केली आहे. जीवन बाजड हे उत्कृष्ट व्यवस्थापक म्हणूनही परिसरात प्रसिद्ध आहेत. जीवन बाजड यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे पाटील फायनान्सची फायनान्स क्षेत्रात नवी ओळख निर्माण केली आहे. मनमिळावू स्वभाव असलेले जीवन बाजड हे ग्राहक यांच्या मनाचा ठाव घेणारे व्यक्तिमत्व म्हणूनही प्रसिद्ध आहेत. ग्राहकांना आपलेपणाची वागणूक देत आलेला प्रत्येक ग्राहकांचे मन जिंकण्याचे काम जीवन बाजड करीत आले आहेत. अगदी कमी वेळात जीवन बाजड यांनी आपल्या चाणाक्ष बुद्धीच्या बळावर फायनान्स क्षेत्रात भरारी घेतली आहे.

### पाटील हॉस्पिटलमध्ये उपलब्ध सुविधा

- प्रसूतिगृह
- बालरोग
- कलर सोनोग्राफकी
- डिजिटल एक्स रे
- मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर
- सुसज्ज आईसीयू
- स्पेशल-सेमीस्पेशल रूम्स
- जनरल वार्ड
- २४ तास अत्यावशक सेवा
- एमबीबीएस डीजीओ स्त्रीरोग तज्ञ
- एमबीबीएस डीएमआरई सोनोग्राफी तज्ञ
- पूर्ण वेळ उपलब्ध



मा.श्री.डॉ. मंगेश बाजड पाटील यांची विदर्भ विभाग प्रमुख, शिवसेना डॉक्टर सेल आयुष होमिओपॅथिक विंग नियुक्ती झाल्याबद्दल. मा.ना. श्री.प्रतापराव जाधव मंत्री आयुष (स्वातंत्र प्रभार) आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री भारत सरकार प्रतापराव जाधव यांच्या कडून शुभेच्छा..!

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज सुविधा

पाटील अर्बन — मुख्य शाखा डोणगाव — फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड

डॉ. मंगेश बाजड यांनी आपल्या रुग्णसेवेबरोबरच गोरगरीब जनतेला त्याचबरोबर होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना आर्थिक चंचल भासू नये त्यांचे केवळ आर्थिक टंचाईमुळे शिक्षण थांबू नये हा उदात्त येतो व दूरदृष्टी ठेवून पाटील अर्बन फायनान्स सुरू करू फायनान्स च्या माध्यमातून होतकरू विद्यार्थ्यांना कमी कागदपत्रांमध्ये कर्ज उपलब्ध करून देत विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेण्यासाठी आर्थिक आधार सुरू केला आहे. गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या तात्काळ कर्ज उपलब्ध झाल्याने अनेकांच्या अनेक विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार होऊन त्यांच्या जीवनात आनंदाची बहर आली आहे.

### आजी माजी सैनिकांना ओपीडी शुल्क माफ

देश रक्षणाचे कार्य करणाऱ्या सैनिकां प्रति प्रत्येक भारतीयांच्या मनामध्ये सदैव आदरभाव आहे. या सैनिकांसाठी आपणही काही करावे, आपल्या हातूनही त्यांची सेवा घडावी यासाठी पाटील हॉस्पिटल ने व्यावसायिकता दूर ठेवत हॉस्पिटलच्या स्थापनेपासूनच सैनिकांची सेवा करण्याचा वसा घेतला आहे. पाटील हॉस्पिटल तर्फे सुर्वतीपासूनच आजी-माजी भारतीय सैनिक, पत्नी, मुले, सैनिकांचे आई-वडील अशा संपूर्ण कुटुंबाकडून टुंबाकडून कुठल्याही प्रकारचे तपासणी शुल्क आकारल्या जात नाही. यामुळे, पाटील हॉस्पिटल प्रती अनेकांच्या मनामध्ये आदर भाव निर्माण झाला आहे.

''डोणगाव ही जन्मभूमी असल्याने प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सर्वांचे सहकार्य लाभले आहे. त्यामुळे, या मातीचे माझ्यावर अनेक ऋण आहे. या ऋणातून उतराई होणे शक्य नाही. मात्र, आपणही समाजाचे काहीतरी देणे आहे ही भावना मनात ठेवून सर्वांसाठीच कार्य केले जात आहे. मोठ्या शहरात उपलब्ध असणाऱ्या वैद्यकीय सुविद्या ग्रामीण भागात, आपल्या गावी उपलब्ध करून दिल्या आहेत. याला मित्र, नातेवाईक, गावकरी आणि रुग्णांचे सहकार्य पूर्ण सहकार्य लाभत आले आहे. डॉ. मंगेश दत्तात्रय बाजड-पाटील

### रुग्णांच्या सेवेसाठी लवकरच महात्मा फुले जन आरोग्य योजना

ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला आरोग्याच्या सोयीसुविधा मोफत उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शासनाने आयुष्मान भारत आणि महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना सुरू केली आहे. सदर योजना पूर्वी काही ठराविक हॉस्पिटलमध्येच असल्याने ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांना त्याचा अपेक्षित लाभ होत नव्हता. रुग्णांची ही समस्या लक्षात घेता पाटील हॉस्पिटल संचालक डॉ. मंगेश पाटील बाजड यांनी पाटील हॉस्पिटलमध्ये आयुष्यमान भारत आणि महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला असून लवकरच सदर योजना ग्रामीण भागातील पाटील हॉस्पिटल येथे सुरू होणार आहेत. याचा लाभ गरजू व गरगरीब जनतेला होणार आहे. विशेष बाब म्हणजे आयुष्मान भारत व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना प्रथमच खेडे गावात सुरू होत आहे. ही मोठी उपलब्धी आहे. सदर योजना सुरू झाल्यानंतर याचा ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला फायदा होणार आहे. योजनेतंर्गत टायफॉईड, निमोनिया, डेंगू, व्हायरल आजार अशा आजारांवर व सर्व प्रकारचे ऑपरेशन व मोफत उपचार होणार आहेत. विशेष बाब म्हणजे ४ ऑगस्ट २०१९ पासून सुरू केलेल्या पाटील हॉस्पिटलच्या माध्यमातून डॉ. मंगेश बाजड यांनी शेकडो रुग्णांच्या जीवनात आनंदाची बहर आणली आहे.

### एके केअरच्या माध्यमातून आरोग्य रेकॉर्ड डिजीटल


eka.care — Prioritize Health

एके केअर हे एक व्यासपीठ आहे.जे रुग्णांना डॉक्टरांशी जोडते आणि वापरकर्त्यांना त्यांचे आरोग्य रेकॉर्ड डिजिटल पद्धतीने व्यवस्थापित करण्यास अनुमती देते . हे डॉक्टरांच्या अपॉइंटमेंट बुक करणे, वैयक्तिक आरोग्य रेकॉर्ड (पीएचआर) मध्ये प्रवेश करणे आणि जवळील लसीकरण केंद्रे शोधणे यासारख्या वैशिष्ट्यांसह येते. एके केअर डॉक्टर आणि प्रयोगशाळांना त्यांच्या पद्धती डिजिटल पद्धतीने व्यवस्थापित करण्यासाठी साधने देखील प्रदान करते. एके केअर सेवेच्या माध्यमातून डॉक्टरांच्या भेटी घेता येतात. एका केअर प्लॅटफॉर्मद्वारे विविध तज्ञांसोबत अपॉइंटमेंट बुक करू शकता. ज्यामध्ये नागपूरमधील डॉक्टरांचाही समावेश आहे. तसेच डिजिटल आरोग्य नोंदी ठेवून वैयक्तिक आरोग्य रेकॉर्ड डिजिटल पद्धतीने तयार आणि व्यवस्थापित करण्याची परवानगी देते, जे तुमच्या संमतीने आरोग्य सेवा प्रदात्यांसह अक्सेस केले जाऊ शकतात आणि शेअर केले जाऊ शकतात अशा याची आधुनिक सेवा पाटील हॉस्पिटलमध्ये उपलब्ध पेशंटचे आरोग्य सुखमय केले आहे.

### बाजड कुटुंबाला वारकरी संप्रदायाचा वारसा

सुरुवातीपासूनच वारकरी कुटुंबाचा वारसा लाभलेले सुसंस्कृत, जमिनदार व श्रीमंत कुटुंब म्हणून बाजड कुटुंबाची पंचक्रोशीत ओळख आहे. स्व. ह. भ. प.नारायणराव गणपतराव बाजड पाटील यांचे नाव डोणगाव परिसरासह संपूर्ण जिल्ह्यात व शेजारी वाशिम जिल्ह्यातही प्रसिद्ध असून आजही त्यांचे नाव आदराने घेतले जाते.स्व. ह.भ.प.नारायणराव बाजड यांच्या कार्याचा वसा त्यांचे पूत्र दत्तात्रयराव बाजड, सून सौ.नंदाताई दत्तात्रयराव बाजड यांनी पुढे चालवला. तर आता स्व. ह.भ.प.नारायणराव बाजड यांचे नातू डॉ. मंगेश दत्तात्रयराव बाजड यांनी आजोबा व वडिलांचा वारसा पुढे सुरू ठेवला आहे.आजरोजी वैद्यकीय, बँकिंग, राजकीय, सामाजिक अशा क्षेत्रात आपली ओळख निर्माण केली आहे. सुरुवातीपासून परोपकारी असलेल्या बाजड कुटुंबाने अनेकांना आधार देत त्यांच्या जीवनात सुख-समृद्धी आणली आहे. स्व. ह. भ.प.नारायणराव बाजड यांच्यानंतर त्यांचा मुलगा दत्तात्रयराव नारायणराव बाजड पाटील व सून सौ. नंदा दत्तात्रयराव बाजड यांनी राजकीय, धार्मिक, सामाजिक अशा सर्व क्षेत्रात आपले कार्य सुरू ठेवून सामाजिक दायित्व पार पडले आहे.तर आता मंगेश बाजड पाटील यांनी आपल्या वडील व आजोबाचा वारसा समोर सुरू ठेवत त्यामध्ये भर घालून सामाजिक, राजकीय, बँकिंग वैद्यकीय अशा सर्व क्षेत्रात आपली ओळख निर्माण केली आहे. एवढेच नव्हे तर, शेकडो कुटुंबाला आर्थिक आधार देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभे केले आहे. त्याचबरोबर शेकडो युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे.

डॉ. मंगेश बाजड यांची शिवसेना डॉक्टर सेलच्या विदर्भ विभाग उपप्रमुखपदी निवड डोणगाव येथील प्रसिद्ध पाटील मल्टीस्पेशियालिटी हॉस्पीटलचे संचालक, पाटील मल्टीस्टेट अर्बनचे अध्यक्ष डॉ. मंगेश बाजड पाटील यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची दखल घेत शिवसेना डॉक्टर सेल आयुष होमिओपॅथिक विंगच्या विदर्भ विभाग उपप्रमुखपदी २१ जुलै रोजी नियुक्ती करण्यात आली.




हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व धर्मवीर आनंद दिघे यांच्या कर्तुत्वाला स्मरुन व शिवसेना पक्ष प्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खा. डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार तसेच शिवसेना डॉक्टर सेल प्रदेशप्रमुख डॉ. धनंजय गोविंदराव पडवळ यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रदेश शिवसेना डॉक्टर सेल अंतर्गत आयुष होमिओपॅथिक विंग प्रदेश उप-प्रमुख पदी ३ वर्षाकरिता नियुक्ती करण्यात आली आहे. हिंदू हृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार व धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण व एकनाथराव शिंदे व श्रीकांत एकनाथराव शिंदे यांच्या जनहित कार्याचा प्रचार व प्रसार कराल आणि पक्षवाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास नियुक्ती पत्रात महाराष्ट्र राज्य होमिओपॅथिक डॉक्टर सेलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. करणसिंह अशोकराव गाडे यांनी व्यक्त केला आहे. तर निवडी संदर्भात प्रतिक्रिया देताना शिवसेना डॉक्टर सेलचे विदर्भ विभाग उपप्रमुख डॉ. मंगेश बाजड यांनी माझ्यावर उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे डॉक्टर श्रीकांत शिंदे तसेच डॉ.करणसिंह गाडे यांनी टाकलेला विश्वास साला तडी न जाऊ देता रुग्णसेवा करणार असल्याचे सांगून महाराष्ट्रातील रुग्णांना केवळ राशनकार्ड आणि आधारकार्डवर मोफत उपचार आणि ऑपरेशनसाठी मदत केली जाणार आहे.यासाठी गरजू रुग्णांनी संपर्क साधण्याचे आवाहन डॉ. मंगेश पाटील बाजड यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांच्या हितासाठी उभारले पाटील इरिगेशन अँण्ड ड्रिप




मुळात शेतकरी पुत्र असल्यामुळे डॉ.मंगेश बाजड यांची शेतीशी नाळ जुळलेली आहे. शेतकऱ्यांचे कष्ट काय राहतात. याची जानही त्यांना आहे. शेतकरी हिताय शेतकरी सुखाय हे ब्रीद घेऊन पाटील इरिगेशन अँड ड्रीपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ठिबक संच, तुषार सिंचन योजना शासकीय अनुदानावर उपलब्ध करून दिली आहे. विशेष म्हणजे अनुदान वजा करून शेतकऱ्यांना केवळ त्यांच्या हिश्याची रक्कम भरून ठिंबक व तुषार संच उपलब्ध करून देत शेतकऱ्यांचे हित जोपासले जात आहे. वर्षानुवर्षांपासून शेती कसत आलेला शेतकरी कर्जाच्या खाईतच आहे.त्यामुळे शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करावी, श्रम व खर्च कमी करून जास्त उत्पादन घ्यावे. हा हेतू ठेवून डॉ. मंगेश बाजड यांची शेतकऱ्यांप्रती तळमळ कायमच दिसून येत आहे. शेतकऱ्यांनी आर्थिक प्रगती साधावी, यासाठी डॉ.बाजड यांनी पाटील इरिगेशन अँड ड्रीप माध्यमातून शेती व्यवसायात व्यवसायाची निगडित पाऊल टाकून शेतकऱ्यांचे सेवा करण्याला प्राधान्य दिले आहे. याचबरोबर शेतीविषयी शासनाच्या विविध योजनांचा शेतकऱ्यांना फायदा करून देण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करून विविध योजनेचा लाभ शेतकऱ्यांना प्राधान्याने दिला जात आहे. शेती क्षेत्राशी निगडित व्यवसायात टाकलेले पाऊल शेतकऱ्यांच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरले आहे. डॉक्टरकी पेशा असून सुद्धा शेतकऱ्यांप्रती त्यांची तळमळ दिसून येत आहे. डॉ. मंगेश बाजड यांनी परिसरातील शेतकऱ्यांसाठी केलेला छोटासा प्रयत्न परिसरातील शेतकऱ्यांना मोठा आधार झालेला आहे. शेतकऱ्यांना शेती विषयक आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देऊन ते उपलब्ध करून देण्याबरोबरच शासनाच्या विविध योजनांची सुद्धा माहिती डॉ.मंगेश बाजड यांच्याकडून शेतकऱ्यांना दिली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना युवा शेतकरी शेतीकडे वळून कमी खर्चात जास्त उत्पादन घेण्याला प्राधान्य देत असल्याचे परिसरात दिसून येत आहे.डॉ. मंगेश बाजड यांचा छोटासा प्रयत्न अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी मैलाचा ठरला आहे.

### वाढदिवसानिमित्त चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचे आयोजन

परिसरातील गोरगरीब जनतेची रुग्णसेवा करण्याबरोबरच सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या डॉ. मंगेश बाजड यांचा १४ ऑगस्ट रोजी होणारा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात येणार आहे. डॉ. मंगेश बाजड यांनी बेरोजगारांसाठी पाटील इरिगेशनच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून देत शेतीतही अमुलाग्र बदल करीत शेतकऱ्यांचा विकास करण्याचा ध्यास घेतला आहे. गोरगरिबांसाठी संपूर्ण आयुष्य खर्ची करत असलेल्या डॉ. मंगेश बाजड यांच्या वाढदिवसानिमित्त १४ ऑगस्ट रोजी वाढदिवसानिमित्त पार्टी अथवा इतर खर्चिक व बडेजाव करणारा कार्यक्रम न घेता डोणगाव जिल्हा परिषद संपर्क मधील शाळांमध्ये जाऊन चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून चिमुकल्यांसोबत बर्थडे सेलिब्रेशन करतात. त्यांच्या वाढदिवसानिमित्त परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले जात असल्याने विद्यार्थ्यांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झालेले असते.डॉ. मंगेश बाजड यांचा वाढदिवस म्हणजे जिल्हा परिषद शाळांमध्ये साजरा होऊन चिमुकल्यांना काहीतरी भेट मिळणारच हे समीकरण आता परिसरात रूजले असून चिमुकलेही डॉ. मंगेश बाजड यांच्या वाढदिवसाची आतुरतेने वाट पाहतात.तर डॉ. मंगेश बाजड हे वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व मिठाई वाटप करून चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवित वाढदिवस साजरा करतात.परिसरातील गोरगरिबांचा देवदूत असलेल्या डॉ. मंगेश बाजड यांना वाढदिवसानिमित्त तसेच दैनिक आपला विदर्भच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा...!

### गारवा फॅमिली रेस्टॉरंट वर खवय्यांची गर्दी




डॉ. मंगेश पाटील बाजड यांनी वैद्यकीय, फायनान्शियल क्षेत्राबरोबरच हॉटेल क्षेत्रात आपले नाव कमविले आहे. त्यांनी मेहकर बायपास सुलतानपुर रोड येथे गारवा नावाने सुरू केलेली फॅमिली रेस्टॉरंट खवय्यांचे हक्काचे ठिकाण झाले आहे. सहपरिवार शुद्ध शाकाहारी जेवणाची चव डोणगाव सह परिसरातील नागरिक येथे येऊन चाखात आहेत. गारवा फॅमिली गार्डन रेस्टॉरंटमध्ये फॅमिलीकरिता बसण्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे.पार्टी लॉन, ए.सी. रुम, लहान मुलांना खेळण्याची व्यवस्था, पार्कींग व्यवस्था, कपल डिनर, वाढदिवस व कार्यक्रमांकरिता डेकोरेशन, सेल्फी पॉईंट, दर्जे दार साऊंड सिस्टीम, ऑफिशीयल मिटींग करिता प्रोजेक्टर, गार्डन डिनर, कॅन्डल लाईट डिनर आदी सुविधा उपलब्ध करून देत येणाऱ्या ग्राहकांची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर येणारा ग्राहक हा येथून संतुष्ट होऊन जावा या दृष्टीने उत्तम व चविष्ट पदार्थांची रेलचेल या ठिकाणी करण्यात आली आहे.